आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२४ जून २०२४ - सोमवार

१८व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन आजपासून सुरू झालं. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज राष्ट्रपती भवनात भर्तृहरी महताब यांना हंगामी सभापती म्हणून शपथ दिली. त्यानंतर सर्व सदस्यांचा शपथविधी सुरू झाला. सभापतींनी सर्वप्रथम वाराणसीचे खासदार नरेंद्र मोदी यांना शपथ दिली. भाजप खासदार राधामोहन सिंग आणि फग्गन सिंग कुलस्ते यांनी तालिका सदस्य म्हणून शपथ घेतली. मात्र , काँग्रेसचे खासदार के सुरेश , द्रमुकचे खासदार टी. आर. बाळू आणि टीएमसीचे सुदीप बंदोपाध्याय यांनी शपथ घेतली नाही. केंद्रीय मंत्री अमित शहा , राजनाथ सिंह, शिवराज सिंह चौहान, नितीन गडकरी, मनोहर लाल, पीयूष गोयल, जितनराम मांझी, राजीव रंजन सिंह, वीरेंद्र कुमार, किरेन रिजिजू, चिराग पासवान, आणि इतर सदस्यांनी सभागृहाच्या सदस्यत्वाची शपथ घेतली. पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ, जळगावच्या खासदार रक्षा खडसे, केंद्रीय राज्य मंत्री प्रतापराव जाधव यांनी मराठीतून शपथ घेतली. लोकसभेत आज आणि उद्या नवनिर्वाचित खासदारांचा शपथविधी होणार आहे.

येत्या बुधवारी २६ जूनला नवीन लोकसभा सभापतींची निवड होणार आहे. राज्यसभेचं अधिवेशन येत्या गुरुवारी २७ जूनला सुरु होणार असून त्याच दिवशी दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचं अभिभाषण होईल.

अधिवेशन ३ जुलैपर्यंत चालेल.

**<><><><><>**

विकसित भारत घडवण्याच्या संकल्पाने १८ व्या लोकसभेचे पहिलं अधिवेशन सुरू होत असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. आपलं सरकार देशसेवेसाठी आणि जनतेच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी सातत्यानं प्रयत्न करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. अधिवेशनापूर्वी संसदेच्या आवारात

त्यांनी पत्रकारांना संबोधित केलं. आपल्या सरकारला सर्वांना सोबत घेऊन आणि संविधानाचं पावित्र्य राखून लवकर निर्णय घ्यायचे असल्याचं त्यांनी सांगितलं. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच लोकसभेच्या खासदारांचा शपथविधी सोहळा नवीन संसद भवनात होत असल्याचं ते म्हणाले. लोकशाहीची प्रतिष्ठा राखण्यासाठी विरोधकांकडून योग्य वर्तनाची अपेक्षा असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

गव्हाचे दर स्थिर राखण्याच्या दृष्टीनं साठेबाजी रोखण्याकरता केंद्र सरकारनं गव्हाच्या साठवणुकीवर मर्यादा घातल्या आहेत. केंद्रीय अन्न आणि सार्वजनिक वितरण सचिव संजीव चोप्रा यांनी आज नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. त्यानुसार व्यापारी आणि घाऊक विक्रेत्यांसाठी ही मर्यादा ३ हजार टन , किरकोळ विक्रेत्यांसाठी १० टन , तर मोठ्या साखळी समूहांच्या प्रत्येक दुकानाकरता १० टन आणि त्यांच्या आगारांकरता ३ हजार टन इतकी आहे.

सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या सर्व व्यापारी , घाऊक विक्रेते , किरकोळ विक्रेते, साखळी समूह आणि प्रक्रियाकर्त्यांना ही मर्यादा लागू आहे. ३१ मार्च २०२५ पर्यंत ती लागू राहील , असं चोप्रा यांनी सांगितलं. गव्हाचे दर स्थिर रहावेत यासाठी सरकार गरजेनुसार या साठा मर्यादेचा आढावा घेईल , असं ते म्हणाले.

गव्हाचा तुटवडा असल्याचं वृत्त त्यांनी फेटाळलं. देशात कुठेही तुटवडा नसून गव्हाचे दर स्थिर आहेत. ते स्थिर रहावेत यासाठी सरकारपुढं सर्व पर्याय खुले आहेत. साठवणुकीवरची मर्यादा हा एक उपाय आहे , तो केला आहे , असं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

वैद्यकीय आणि दंतवैद्यकीय पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठीच्या नीट-यूजी परीक्षा पेपरफुटीप्रकरणी कारवाईला वेग आला आहे. केंद्रीय अन्वेषण संस्थेकडे हा तपास सोपवण्यात आला असून सीबीआयने याप्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. नीट-यूजी पेपरफुटी आणि गैरव्यवहार प्रकरणी विविध यंत्रणांनी विविध राज्यांतून अनेक संशयितांना ताब्यात घेतलं असून त्यांची चौकशी सुरु आहे.

अतिरिक्त गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांची फेरपरीक्षा काल झाली. एकंदर ८१३ विद्यार्थ्यांनी ही फेरपरीक्षा दिल्याची , तर साडेसातशे विद्यार्थी गैरहजर राहिल्याची माहिती राष्ट्रीय परीक्षा संस्थेनं दिली आहे.

**<><><><><>**

१२व्या पारपत्र दिनानिमित्त परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी पारपत्र कार्यालयातले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. नागरिकांना पारपत्र सेवा विश्वासार्ह आणि वक्तशीर मिळावी याकरता पारपत्र कार्यालयं करत असलेल्या प्रयत्नांचं त्यांनी कौतुक केलं. २०२३ मधे देशात एक कोटी ६५ लाख नागरिकांना पारपत्र देण्यात आली , अशी माहिती त्यांनी दिली. नागरिकांना देशात आणि देशाबाहेरही सुलभपणे पारपत्रं मिळावी याकरता डिजीलॉकर , पासपोर्ट पोलीस ॲप अशा अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत असल्याचंही जयशंकर यांनी सांगितलं.

**<><><><><>**

आयसीसी पुरुष क्रिकेट टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या सुपर ८मध्ये आज भारताचा सामना ऑस्ट्रेलियाशी होणार आहे. सेंट लूसिया इथल्या डॅरेन सॅमी मैदानावर भारतीय प्रमाणवेळेनुसार रात्री ८ वाजता हा सामना सुरू होईल.

आज सकाळी दक्षिण आफ्रिका आणि वेस्ट इंडीज यांच्यातल्या सामन्यात व्यत्यय आल्यानंतर डकवर्थ लुइस पद्धतीनं निर्णय झाला. दक्षिण आफ्रिकेनं सामना जिंकल्याचं घोषित करण्यात आलं. तत्पूर्वी काल रात्रीच्या सामन्यात गतविजेत्या इंग्लंडनं अमेरिकेचा १० गडी राखून पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला.

//<><><><><>//